**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

# प्रसिद्धी विभाग

# शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

## हुतात्मा शिवराम हरी राजगुरू राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा : वर्ष ३२ वे

प्रभात

## सांघिक विजेतेपदाचा करंडक राजगुरू महाविद्यालयाकडे

### हुतात्मा राजगुरू वक्तृत्व स्पर्धा : प्रणाली पाटील, गायत्री अंभुरे प्रथम

**राजगुरूनगर, दि. २५ (प्रतिनिधी)** - हुतात्मा राजगुरू वक्तृत्व स्पर्धेचा सांघिक विजेतेपदाचा करंडक राजगुरू महाविद्यालयाकडे तर प्रणाली पाटील व गायत्री अंभुरे यांचा प्रथम क्रमांक मिळवला आहे.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेमध्ये सांघिक विजेतेपदाचा चषक व रुपये ५000/- रोख रकमेचे पारितोषिक हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या प्रणिता कोळेकर, काजल वाळुंज, मयुरी टोके, अक्षदा कोळेकर यांनी पटकावले. तर वरिष्ठ व कनिष्ठ गटात अनुक्रमे प्रणाली पाटील व गायत्री अंभुरे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. दोन्ही गटातील विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम व अनुक्रमे हुतात्मा राजगुरु चषक, साहेबरावजी बुट्टेपाटील स्मुतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेचे उदघाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, हिरामण सातकर, मुरलीधर खांगटे, सुरेश टाकळकर, राजेंद्र टाकळकर, विजय वाडेकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, एस. बी. एम. चे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. स्पर्धेचे हे ३२ वे वर्ष होते. या स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कक्षेतील ५२ स्पर्धक सहभागी झाले.



स्पर्धेचे परीक्षक असलेल्या डॉ. नानासाहेब पवार यांनी वक्तृत्व स्पर्धेकांकडे ज्ञानशक्ती, हेतूशक्ती व भाषाशक्ती आवश्यक असल्याचे म्हटले. तर परीक्षक प्रा. शिवराज आनंदकर यांनी विद्यार्थ्यांना आशयघन वाचण्याचा व ऐकण्याचा सल्ला दिला. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. नानासाहेब पवार (सासवड), डॉ. सुवर्णा खोडदे (पुणे), प्रा. शिवराज आनंदकर (अहमदनगर) यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शिरीष पिंगळे यांनी, सूत्रसंचालन प्रा. ज्योती लांडगे व प्रा. मयुरी मांजरे यांनी, निकालवाचन प्रा. एम. एल. मुळूक यांनी तर स्पर्धा संयोजक डॉ. संजय शिंदे यांनी आभार मानले.

PuneDistrict, 26 Aug 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

लोकमत

# विजेतेपदाचा करंडक राजगुरू महाविद्यालयाकडे

## हुतात्मा राजगुरू वक्तृत्व स्पर्धा : पुणे विद्यापीठ कक्षेतील ५२ स्पर्धक सहभागी

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर** : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेमध्ये सांघिक विजेतेपदाचा चषक व ५०००/- रोख रकमेचे पारितोषिक हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या प्रणिता कोळेकर, काजल वाळुंज, मयूरी टोके, अक्षदा कोळेकर यांनी पटकावले; तर वरिष्ठ व कनिष्ठ गटांत अनुक्रमे प्रणाली पाटील व गायत्री अंभुरे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. दोन्ही गटांतील विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम व अनुक्रमे हुतात्मा राजगुरू चषक, साहेबरावजी बुट्टे-पाटील स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, हिरामण सातकर, मुरलीधर खांगटे, सुरेश टाकळकर, राजेंद्र टाकळकर, विजय वाडेकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, एस. बी. एम.चे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. स्पर्धेचे हे ३२ वे वर्ष होते. या स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कक्षेतील ५२ स्पर्धक सहभागी झाले.

परीक्षक म्हणून डॉ. नानासाहेब पवार, डॉ. सुवर्णा खोडदे, प्रा. शिवराज आनंदकर यांनी काम पाहिले. डॉ. शिरीष पिंगळे यांनी प्रास्ताविक, प्रा. ज्योती लांडगे व प्रा. मयूरी मांजरे यांनी सूत्रसंचालन, प्रा. एम. एल. मुळूक यांनी निकालवाचन केले; तर डॉ. संजय शिंदे यांनी आभार मानले.



वक्तृत्व स्पर्धेतील पारितोषिकप्राप्त विद्यार्थी व मान्यवर.

- वरिष्ठ गट : प्रथम क्रमांक - प्रणाली पाटील (कला व वाणिज्य महाविद्यालय, बेलापूर ७५००/- व करंडक), द्वितीय क्रमांक - तेजस पाटील (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ३०००/- व करंडक) अंकिता शिंदे (सरसेनापती हंबीरराव मोहिते विधि महाविद्यालय २०००/- व करंडक) यांनी पटकविला. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने सदर बक्षीस देण्यात आले.
- कनिष्ठ गट - प्रथम क्रमांक गायत्री अंभुरे ( फर्ग्युसन महाविद्यालय पुणे ५०००/- व करंडक), द्वितीय क्रमांक प्रणिता कोळेकर (हुतात्मा राजगुरु महाविद्यालय ३०००/- व करंडक ) तृतीय क्रमांक योगिता यादव ( महात्मा गांधी विद्यालय, रा. नगर २०००/- व करंडक ) यांनी पटकविला. खेड तालुका खरेदी-विक्री संघाच्या वतीने साहेबराव सातकर यांच्या स्मरणार्थ बक्षीस देण्यात आले.
- उत्तेजनार्थ बक्षिसे : वरिष्ठ गटात- मुग्धा थोरात, भास्कर शिवले, रोहन कवडे तर कनिष्ठ गटात संस्कृती मोरे, यशस्वी पवार, काजल वाळुंज अशा सहा स्पर्धकांना अरिहंत पतसंस्थेच्या वतीने प्रत्येकी २०००/- रु. व प्रमाणपत्र अशा स्वरुपात देण्यात आली.

Hello Pune Gramin
Page No. 4 Aug 26, 2023
Powered by: erelego.com

सकाळ

# वक्तृत्व स्पर्धेत राजगुरू महाविद्यालयाचा ठसा



राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त विद्यार्थी.

**राजगुरुनगर, ता. २ :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेमध्ये सांघिक विजेतेपदाचा चषक व पाच हजार रुपये रोख रकमेचे पारितोषिक प्रणिता कोळेकर, काजल वाळुंज, मयूरी टोके, अक्षदा कोळेकर यांनी पटकाविले.तर, वरिष्ठ व कनिष्ठ गटात अनुक्रमे प्रणाली पाटील व गायत्री अंभुरे यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

स्पर्धेचे हे ३२ वे वर्ष आहे. या स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कक्षेतील ५२ स्पर्धक सहभागी झाले होते. विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम, हुतात्मा राजगुरू चषक, साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर,संचालक हिरामण सातकर, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, मुरलीधर खांगटे, सुरेश टाकळकर, राजेंद्र टाकळकर, विजय वाडेकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, एस. बी. एम. चे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

**स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :**

**वरिष्ठ गट :** प्रथम क्रमांक - प्रणाली पाटील (कला व वाणिज्य महाविद्यालय, बेलापूर), द्वितीय क्रमांक - तेजस पाटील ( सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे), तृतीय क्रमांक - अंकिता शिंदे (सरसेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालय, राजगुरुनगर).

**कनिष्ठ गट :** प्रथम क्रमांक - गायत्री अंभुरे (फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे), द्वितीय क्रमांक - प्रणिता कोळेकर (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर), तृतीय क्रमांक - योगिता यादव (महात्मा गांधी विद्यालय, राजगुरुनगर).

वरिष्ठ गटात मुग्धा थोरात, भास्कर शिवले, रोहन कवडे तर कनिष्ठ गटात संस्कृती मोरे, यशस्वी पवार, काजल वाळुंज अशा ६ स्पर्धकांना उत्तेजनार्थ बक्षीसे देण्यात आली.

यास्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. नानासाहेब पवार (सासवड), डॉ. सुवर्णा खोडदे (पुणे), प्रा. शिवराज आनंदकर (अहमदनगर) यांनी काम पाहिले. डॉ. शिरीष पिंगळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा. ज्योती लांडगे व प्रा. मयूरी मांजरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एम. एल. मुळूक यांनी निकालवाचन केले. स्पर्धा संयोजक डॉ. संजय शिंदे यांनी आभार मानले.

Pune, District-Today
03/09/2023 Page No. 6

पुढारी

# सांघिक करंडक राजगुरू महाविद्यालयाकडे

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित हुतात्मा शिवराम हरी राजगुरू आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेमध्ये सांघिक विजेतेपदाचा चषक व ५ हजार रोख रकमेचे पारितोषिक हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या प्रणिता कोळेकर, काजल वाळुंज, मयूरी टोके, अक्षदा कोळेकर यांनी पटकाविले, तर वरिष्ठ व कनिष्ठ गटात अनुक्रमे प्रणाली पाटील व गायत्री अंभुरे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

दोन्ही गटांतील विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम व अनुक्रमे हुतात्मा राजगुरू चषक, साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, हिरामण सातकर, मुरलीधर खांगटे, सुरेश टाकळकर, राजेंद्र टाकळकर, विजय वाडेकर, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, एस. बी. एम.चे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. स्पर्धेचे हे ३२ वे वर्ष होते. या स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कक्षेतील ५२ स्पर्धक सहभागी झाले.



हुतात्मा राजगुरू वक्तृत्व स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त विद्यार्थी.

**हुतात्मा राजगुरू वक्तृत्व स्पर्धा**

वरिष्ठ गट : प्रथम क्रमांक- प्रणाली पाटील (कला व वाणिज्य महाविद्यालय बेलापूर, ७५०० रुपये व करंडक), द्वितीय क्रमांक- तेजस पाटील (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, ३ हजार व करंडक), अंकिता शिंदे (सरसेनापती हंबीरराव मोहिते विधी महाविद्यालय, २ हजार रुपये व करंडक) यांनी पटकविला. खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने हे बक्षीस देण्यात आले.

कनिष्ठ गट : प्रथम क्रमांक- गायत्री अंभुरे (फर्ग्युसन महाविद्यालय पुणे, ५ हजार रुपये व करंडक), द्वितीय क्रमांक- प्रणिता कोळेकर (हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, ३ हजार व करंडक), तृतीय क्रमांक- योगिता यादव (महात्मा गांधी विद्यालय राजगुरुनगर, २ हजार रुपये व करंडक) यांनी पटकविला. खेड तालुका खरेदी-विक्री संघाच्या वतीने साहेबराव सातकर यांच्या स्मरणार्थ बक्षीस देण्यात आले. उत्तेजनार्थ बक्षिसे वरिष्ठ गटात मुग्धा थोरात, भास्कर शिवले, रोहन कवडे तर कनिष्ठ गटात संस्कृती मोरे, यशस्वी पवार, काजल वाळुंज अशा ६ स्पर्धकांना अरिहंत पतसंस्थेच्या वतीने प्रत्येकी २ हजार रुपये व प्रमाणपत्र अशा स्वरूपात देण्यात आली. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. नानासाहेब पवार (सासवड), डॉ. सुवर्णा खोडदे (पुणे), प्रा. शिवराज आनंदकर (अहमदनगर) यांनी काम पाहिले. प्रास्ताविक डॉ. शिरीष पिंगळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ज्योती लांडगे व प्रा. मयूरी मांजरे यांनी केले. निकालवाचन प्रा. एम. एल. मुळुक यांनी केले, तर स्पर्धा संयोजक डॉ. संजय शिंदे यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Aug 26, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख